लोकसत्ता
★ मुंबई; रविवार, १० एप्रिल २००५

# गोडवा होमिओपथीचा

आजच्या रीमिक्सच्या युगात आपले मानवी शरीरही आजारांच्या रीमिक्सचे घर झालेले आहे. या धकाधकीच्या आयुष्यात रोज एका नवीन आजाराची भर पडत आहे. त्याचप्रमाणे रोज एका नवीन उपचारपद्धतीचाही जन्म होत आहे. आज सर्वसाधारण लोकांचा कल ॲलोपथीव्यतिरिक्त इतर उपचारपद्धतींकडे जास्त झुकू लागला आहे. अशीच एक दोनशे वर्षे जुनी अतिशय लोकप्रिय उपचारपद्धती आहे 'होमिओपथी'. मुळात होमिओपथीचा जन्म हा ॲलोपथीच्या मर्यादांमुळे झाला. जर्मनीतील डॉ. सॅम्युअल हानिमान एक निष्णात ॲलोपथिक होते. डॉक्टरीचा व्यवसाय करताना, डॉ. हानिमान, ॲलोपथिक औषधांच्या उपयुक्ततेबाबत आणि तत्कालीन एकंदरीत प्रचलित उपचारपद्धतीबाबत समाधानी नव्हते. ॲलोपॅथिक औषधांचा रोग्यावर होणाऱ्या दुष्परिणामांनी ते व्यथित होत. म्हणूनच त्यांनी रोग्याला कोणताही आघात न करता, त्यांच्या जीर्ण रोगातून संपूर्णपणे मुक्त करणाऱ्या, खाण्यासही अतिशय सोप्या आणि गोड अशा चिकित्सापद्धतीचा- 'होमिओपथी'चा शोध लावला. होमिओपथीची एक तत्त्वप्रणाली आहे. हे शास्त्र 'समं समः शमयति' या निसर्गनियमावर आधारित आहे. होमिओपथीची तत्त्वे सांगतात की, प्रत्येक रोगाचे कारण हे त्या त्या व्यक्तीच्या कमी पडणाऱ्या प्रतिकारशक्तीमध्ये असते. प्रत्येक व्यक्तीच्या शरीरात उपजतच एक डॉक्टर वास करीत असतो, म्हणजेच कोणत्याही रोगापासून त्याचा बचाव करणारी त्याची प्रतिकारशक्ती. जेव्हा ही प्रतिकारशक्ती काही कारणास्तव कमी पडू लागते तेव्हा ती व्यक्ती आजारी पडते आणि त्या वेळेस जीवाणू, विषाणू त्याच्या शरीरात घर करू लागतात. मात्र होमिओपथी व्यक्तीची प्रतिकारशक्ती वाढविण्याचे करण्याचे काम करते. रोगाची लक्षणे जरी सारखी असली तरी प्रत्येक व्यक्तीत ती भिन्न स्वरुपात पाहायला मिळतात. म्हणूनच होमिओपथीमध्ये व्यक्तीची शारीरिक ठेवण, तहान, भूक, बाहेरील तापमानाचे वातावरणाने त्याच्यावर होणारे परिणाम, खाण्या-पिण्यातील आवडी-निवडी, झोप, स्वप्ने, त्या रोगामुळे त्याच्यात झालेले बदल, त्याच्या चिंता, काळजी, स्वभावविशेष अशा विविध बाबींचा विचार करून मगच योग्य औषध दिले जाते. होमिओपॅथ केवळ औषध देऊन गप्प बसत नाही, तर तो त्या रुग्णाच्या उपचारात, ज्याच्या आजाराच्या प्रवासात, प्रत्येक टप्प्यावर या रुग्णाबरोबर असतो. आजार शरीरात कोणत्या दिशेने जात आहे, दाबला जातो आहे की बाहेर पडत आहे याची निरीक्षणे करत असतो, त्याबद्दल रुग्णाला मार्गदर्शन करत असतो. आज या क्षेत्रातील डॉ. विजयकर, डॉ. अनिता साळुंखे आदी तज्ज्ञ हृदयरोग, मधुमेह, थायरॉइड, सिरॉसिस, डाऊन्स सिन्ड्रोम, पार्किन्सन्स, स्किझोफ्रेनिया, कर्करोग, एड्स, पक्षाघात, कोमासारख्या आशा सोडून दिलेल्या रुग्णांना होमिओपथीचे उपचार देत आहेत. त्याचबरोबर टायफॉइड, मलेरिया, न्यूमोनिया इ. सारख्या केसेस लीलया हाताळत आहेत. आज होमिओपथिक क्षेत्रात भारताचे स्थान खूप वरचे आहे. पण आज सरकारनेही गावागावात हॉस्पिटल्स किंवा दवाखाने उघडण्यास या होम्योपॅथ्सना मदत केली तर होमिओपथी ही केवळ शहरापुरती मर्यादित न राहता तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचेल आणि डॉ. हानिमनना त्यांच्या या अडीचशेव्या जयंतीवर्षात तीच खरी श्रद्धांजली ठरेल.

**होमिओपथीचे जनक डॉ. सॅम्युअल हानिमान यांचा १० एप्रिल १७५५ हा जन्मदिन. हा दिवस जगभरात 'हानिमान दिवस' म्हणून पाळला जातो. त्यानिमित्ताने हा लेख.**

■ डॉ. कविता अंकुश सावंत
drkavitas@yahoo.com